तरुण भारत बुधवार, २५ जानेवारी २०२३

# हळबे महाविद्यालयात ध्वज बांधणी, ध्वज संहिता मार्गदर्शन



दोडामार्ग : हळबे महाविद्यालयात ध्वज बांधणीचे प्रात्यक्षिक दाखवताना विजयकुमार साळुंखे.

प्रतिनिधी
दोडामार्ग

लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात ध्वजबांधणी आणि ध्वजसंहिता या विषयावर मार्गदर्शन व व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून शिक्षक विजयकुमार साळुंखे उपस्थित होते.

प्रथमत: त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर साळुंखे यांनी सर्वांना तिरंगा, त्याची बांधणी व संहिता याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच ध्वज बांधणीचे प्रात्यक्षिक करून दाखविले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.